# शासकीय अध्यापक महाविद्यालय ,पनवेल.

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड.

## वैज्ञानिक जाणिवा प्रशिक्षण कार्यशाळा: २०२४

दिनांक १२/८/२०२४ व दिनांक १३/८/२०२४ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड या दोन्हींच्या संयुक्त विद्यमाने वैज्ञानिक जाणिवा विकसन कार्यशाळेचे आयोजन शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल येथे करण्यात आले. या कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये समन्वयक प्रा. बिजली दडपे मॅडम यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे सर होते. या शिबिराचे प्रास्ताविक श्री.तुकाराम शिंदे यांनी केले.

**या दोन कार्य शाळेमध्ये दिनांक: १२/८/२०२४ रोजी** श्री महेंद्र नाईक यांचे 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या विषयावर प्रथम व्याख्यान झाले. त्यानंतर गटचर्चा करण्यात आली आणि गटचर्चा व सादरीकरण झाले. दुसरे व्याख्यान 'बुवाबाजी आणि फसवे विज्ञान' या विषयावर प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे यांचे झाले. त्यानंतर ' व्यसन व व्यसनमुक्ती'या विषयावर श्रीम. तेजल खेडकर यांचे व्याख्यान झाले.

**दिनांक :१३/८/२०२४ रोजी** 'व्रतवैकल्ये आणि अंधश्रद्धा'या विषयावर आरती नाईक यांचे व्याख्यान झाले तसेच संत समाज सुधारकांचा वारसा फसवणूक व शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांचे निर्मूलन'या विषयावर सुशीला मुंडे यांचे व्याख्यान झाले. 'मानसिक आरोग्य या विषयावर' डॉ. अनिल डोंगरे यांचे व्याख्यान झाले.' जादूटोणा व जात पंचायत कायदा' या विषयावर सुशीला मुंडे यांचे व्याख्यान झाले. तसेच 'परीक्षांचे मार्गदर्शन' तुकाराम शिंदे यांनी केले.

**कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम :-**

दिनांक: १३/८/२०२४ कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.बिजली दडपे होत्या. या कार्यक्रमाविषयी शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यानंतर प्रा. बिजली दडपे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेत सहभागी शिक्षकांना या प्रसंगी प्राध्यापक बिजली दडपे, श्री. मच्छिंद्रनाथ मुंडे ,श्री महेंद्र नाईक ,श्री मनोहर तांडेल, श्रीमती. आरती नाईक यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शासकीय अध्यापक महाविद्यालय आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, यांनी संयुक्तपणे आपली जबाबदारी सुयोग्यरित्या पार पाडली.श्री मनोहर तांडेल यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. या कार्यक्रमात शिक्षकांनी गुणवत्तापूर्ण सहभाग नोंदवला.

Edit with WPS Office




माननीय प्राचार्य डॉ . रमा भोसले
उद्घाटनपर संबोधन करताना



या कार्यशाळेच्या समन्वयक
माननीय प्रा. बिजली दडपे आपले
मनोगत व्यक्त करताना



श्री. तुकाराम शिंदे कार्यशाळेचे
प्रास्ताविक करताना




श्री. महेंद्र नाईक कार्यशाळेतील
शिक्षकांना मार्गदर्शन करताना




श्रीमती .आरती नाईक
कार्यशाळेतील शिक्षकांना
मार्गदर्शन करताना



समारोप प्रसंगी
माननीय प्रा. बिजली दडपे
अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना

Edit with WPS Office



श्री मनोहर तांडेल
कार्यशाळेचे आभार व्यक्त करताना



कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी
आपले मनोगत व्यक्त करताना

Edit with WPS Office